*Dnyandeep Shikshan Prasarak Mandal's*

# Dr. Khatri Mahavidyalaya

**Tukum, Chandrapur (M.S.)**

## Organise Two Days National Conference

*In collaboration with*

*Sevadal Education Society's*

# Sevadal Mahila Mahavidyalaya,

**Nagpur (M.S.)**

***Date-25th & 26th February 2022 on online platform-CISCO-WEBEX***

# CERTIFICATE OF PARTICIPATION

This is to certify that DR.KAVITA RAVINDRA BORKAR Designation Asso.Prof. from DR.M.K UMATHE COLLEGE NAGPUR CRN No. DKSM281 has actively participated in the Two Days National Conference on **"Current Dimensions in Social Science and Commerce-2022"** organized by Dr. Khatri Mahavidyalaya Tukum, Chandrapur in collaboration with Sevadal Mahila Mahavidyalaya, Nagpur on 25th & 26th February 2022 on online Platform CISCO-WEBEX.

| Principal | Convener | Convener | Principal |
|---|---|---|---|
| Dr. Janardhan M. Kakde | Dr. Gajanan R. Sapat | Dr. Shashikant Rokade | Prof. Pravin Charde |
| Dr. Khatri Mahavidyalaya Tukum Chandrapur. | Dr. Khatri Mahavidyalaya Tukum Chandrapur | Sevadal Mahila Mahavidyalaya Nagpur | Sevadal Mahila Mahavidyalaya Nagpur |

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Scanned with OKEN Scanner

# National Steps for Women Empowerment
# राष्ट्राने महिला सबलीकरणासाठी उचललेले पाऊल

डॉ. कविता आर. बोरकर
सहयोगी प्राध्यापक
गृहअर्थशास्त्र विभाग
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज,
भामटी, रिंग रोड, नागपूर 22.
मो. : 9730538882
Email :- kavitaborkar52@gmail.com

'महिला सबलीकरण' ही संकल्पना महिलांच्या विकासाच्या संदर्भात रूढ झाली आहे. पावलो फ्रोरे यांनी सर्वप्रथम ही संकल्पना उपयोगात आणली. अबला महिलांना सबला करणे, त्यांना हक्क व संधी देणे. हा उद्देश त्यांना अभिप्रेत होता.

1) महिलांना समाजकारणात, अर्थकारणात पुरूषांच्या बरोबरीने आणून त्यांना मानसिकदृष्ट्या, सुदृढ करणे. म्हणजे महिला सबलीकरण होय.

2) महिला सबलीकरण म्हणजे महिलांना स्व–सामर्थ्याची जाणीव करून देणे. सामाजिक, अर्थिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांना सहभागी करून घेणे होय.

स्त्री म्हणजे निसर्गरूपी चित्रकाराच्या कुंचल्यातून साकारलेली एक अप्रतिम कलाकृती आणि या कलाकृतीला पूर्णत्व बहाल करण्यासाठी या चित्रकाराने तिच्यात वैविध्यपूर्ण छटा किंवा रूपे साकारली, ज्याची प्रचिती आपल्याला तिच्या प्रत्येक भूमिकेतून येते. नवसृष्टी निर्माण करण्याची क्षमता असणारी हळवी स्त्री असो, तर कधी कुटूंबाला सर्वस्व अर्पण करणारी त्यागी स्त्री असो आणि प्रसंगी रणरागिणी दुर्गा बनून नरसंहार करणारी स्त्री असो. सर्व भूमिकांना योग्य न्याय देण्याची कला तिच्यात उपजतच आहे.

भारताच्या राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव आदराने घेतले जाते. सर्व देशाचे हित आणि उन्नती व्हावी अशी त्यांची धारणा होती. त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात फार मौलिक आणि अनन्यसाधारण कामगिरी बजावली. भारतातील महिलावर्गाच्या सक्षमीकरणासाठी आणि सबलीकरणासाठी त्यांनी कृतिशील भूमिका घेतली होती.



Scanned with OKEN Scanner

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आपल्या राज्यघटनेची आधारत्रयी आहे. डॉ. आंबेडकर यांचे महिला वर्गाच्या समस्यांचे आकलन अभ्यासपूर्ण होते. व्यापक सखोल, माहितीची, ज्ञानाची, चिंतनाची त्यात जोड होती.

भारतातील स्त्रीमुक्तीच्या कामगिरीत डॉ. आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आणि क्रांतीकारक आहे. वंचित, शोषित, पीडित महिला वर्गाच्या सबलीकरणासाठी, सक्षमीकरणासाठी त्यांची कामगिरी ही आधारभूत आणि साहाय्यक आहे.

1952 नंतर सरकारतर्फे पूर्वीच्या हिंदू कोड मसुद्यातून (1) दि हिंदू मॅरेज ॲक्ट 1977, (2) दि हिंदू सक्सेशन ॲक्ट, जून 1956, (3) दि हिंदू मायनॉरिटी ॲण्ड गार्डियनशिप ॲक्ट ऑगस्ट 1956 आणि (4) दि हिंदू अडॉप्शन ॲण्ड मेन्टेनन्स ॲक्ट, डिसेंबर 1956 हे कायदे करण्यात आले. ते डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री म्हणून राजीनामा दिल्यानंतर झालेले कायदे आहेत.

हिंदू कोड बिलाचे निरनिराळे भाग करून त्यात फेरफार करून नवीन चार कायदे मंजूर करण्यात आले.

**स्त्रियांच्या हितसंरक्षणाच्या हेतूने भारतात वीस कायदे करण्यात आले ते पुढील प्रमाणे–**

(1) सतीप्रतिबंधक कायदा; 1826

(2) हिंदू विधवा पुनःविवाहोत्तेजक कायदा; 1956

(3) धर्मांतराचा पूर्वीचा कायदा रद्द करणारा कायदा; 1866

(4) भारतीय तलाक कायदा; 1872

(5) ख्रिस्ती विवाह कायदा; 1872

(6) विवाहित नारी संपत्ती संरक्षण कायदा; 1974

(7) लीगल प्रॅक्टिशनर (वुइमेन्स) ॲक्ट 1923

(8) बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) कायदा; 1926

(9) हिंदू उत्तराधिकारी अधिनियम (संशोधित) कायदा; 1926

(10) पारसी विवाह आणि तलाक कायदा; 1936

(11) हिंदू नारी संपत्ती अधिकारा कायदा; 1936

(12) प्रसूती अवस्थेत मिळावयाचे हक्क यासंबंधीचा कायदा; 1943



Scanned with OKEN Scanner

(13) हिंदू विजोड विवाह प्रतिबंधक कायदा; 1946

(14) हिंदू विवाह वैधता कायदा; 1942

(15) विशेष विवाह कायदा; 1955

(16) हिंदू विवाह कायदा, 1955

(17) हिंदू उत्तराधिकार कायदा; 1956

(18) हिंदू दत्तकग्रहण आणि निर्वाह कायदा; 1956

(19) हिंदू दत्तकग्रहण कायदा; 1958

(20) वेश्यावृत्ती उन्मूलन कायदा; 1958

शांतता विरूध्द युध्द, भक्कम व्यवस्थेवर आधारित सुरक्षितता, जुलूम व अत्याचार विरोधी लढा अथवा मूलभूत मानवी हक्क या सर्व व्यापक स्वरूपाच्या समस्यांपेक्षा स्त्रियांच्या खास जिव्हाळ्याचे असे लैंगिक अथवा स्त्रियांच्या हक्काचे प्रश्न हे स्त्रियांच्या दृष्टीने सुध्दा खास महत्वाचे आहेत.

**महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या विविध योजना :—**

(1) स्वावलंबन कार्यक्रम 1982

(2) रोजगार आणि प्रशिक्षण सहाय्यक कार्य (स्टॅम्प) 1986

(3) न्य मॉडेल चरखा योजना 1987

(4) नौशक प्रशिक्षण योजना 1989

(5) महिला सामान्य योजना 1989

(6) माता बाल आरोग्य कार्यक्रम 1992

(7) महिला समृध्दी योजना 1993

(8) राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना 1994

(9) इंदिरा महिला योजना 1995

(10) राजराजेश्वरी विमा योजना 1997

(11) स्वास्थ सखी योजना 1997

(12) किशोरी शक्ती योजना 2000–01

(13) महिला स्वाधार योजना 2001–02

(14) महिला उद्योजकांसाठी कर्ज योजना 2001–02



Scanned with OKEN Scanner

(15) कस्तुरबा गांधी विशेष बालिका विद्यालय योजना 2003–04

(16) वंदे मातरम् योजना 2003–04

(17) ASHA योजना 2004–05

(18) बालिका शिक्षण प्रसार योजना 2005–06

वरिल योजना शासनानी महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविल्या आहेत.

महाराष्ट्रामध्ये प्रथमतः 1994 साली महिला धोरणाची सुरूवात झाली. 1994 साली तयार करण्यात आलेले धोरण हे महिला सबलीकरण व सक्षमीकरणासाठी करण्यात आले. त्यानंतर 2001 साली दुसरे धोरण तयार करण्यात आले. धोरण तयार करतांना असे नमूद करण्यात आले की, दर तीन वर्षांनी सुधारीत धोरण तयार करण्यात यावे. असे असले तरी बऱ्याच कालावधीनंतर आता तिसरे महिला धोरण तयार करण्यात येत आहे. या तिसऱ्या धोरणाचा मसुदा सन 2010 साली 'महिला आर्थिक विकास महामंडळ' या शासनाच्या संस्थेन तयार केला आहे.

सन 2001 हे वर्ष भारत सरकारने महिला सबलीकरण वर्ष म्हणून तयार केले होते. महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांचे आध्यात्मिक, राजनितीक व सामाजिक आणि आर्थिक सामर्थ्य वाढविणे. यामध्ये त्यांच्या स्वतःच्या क्षमतासंबंधी त्यांचा आत्मविश्वास विकसित करण्याचा अधिकाराचा समावेश आहे.

महिला सबलीकरणाच्या धोरण तयार करण्याच्या दृष्टीने समाजातील सर्व स्तरातील महिलांचा, तज्ञांचा, जानकारांचा, संस्था–संघटनांचा वैचारिक सहभाग घेणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष महिला उत्थानासाठी कार्यरत असलेल्या महिला व संबंधित संस्था यात अधिक योगदान सहभाग देऊ शकतात. हे सर्व करीत असतांना घटनेच्या चौथ्या भागात मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख आहे. हे ही मार्गर्शक तत्व म्हणून समजून आधार समजून त्याचा स्विकार करणे सर्वांना बंधनकारक आहेत.



Scanned with OKEN Scanner

महिला सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने वाटचाल करतांना शासकीय योजनांचा विचार करणे आवश्यक ठरते. याचे प्रामुख्याने दोन भाग पडतात.

अ) राज्यसरकारच्या विविध योजना  ब) केंद्र सरकारच्या विविध योजना

**राज्यसरकारच्या विविध योजना :–**

1919 साली महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ स्थापन झाले. वित्तपुरवठा कमी व्याजदरामुळे करणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे, हे साध्य करण्यासाठी व महिलांच्या विकासासाठी खालील योजना कार्यान्वित केल्या जातात.

**1) महाराष्ट्रीय महामंडळाची योजना:–**

राष्ट्रीय मागासवर्ग व वित विकास महामंडळ नवी दिल्लीच्या वाहिनीकृत यंत्रणा म्हणून महामंडळ कार्य करते. या महामंडळामार्फत राष्ट्रीय महामंडळाचे मुदती कर्ज, स्वर्णिमा, शैक्षणिक कर्ज योजना, स्वयंसक्षम योजना, सूक्ष्म पतपुरवठा व महिला समृध्दी या योजना राबविण्यात येतात. महामंडळात राज्यशासनाने दिलेल्या ठोक हमीच्या पोटी राष्ट्रीय महामंडळाकडून अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात येतो. या योजनांचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

(1) मुदती कर्ज योजना : या योजनेअंतर्गत महिलांना 3 लाख प्रकल्प मर्यादेपर्यंत कर्जपुरवठा करण्यात येतो. व्याजाचा दर 6 टक्के असून परतफेड 5 वर्षात करण्याची असते.

(2) स्वर्णिमा योजना : रू. 50,000/– या प्रकल्प मर्यादेपर्यंत महिलांच्या विकासाकरिता 4 टक्के कर्ज मंजुर करण्यात येते व परतफेडीचा कालावधी 7 वर्षाचा असतो.

(3) शैक्षणिक कर्ज योजना :– या योजनेअंतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या महिलांना प्रतिवर्षी जास्तीतजास्त 1,25,000/– रू. कर्ज मंजूर करण्यात येते. व्याजाचा दर 4 टक्के परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यावर करता येते.

(4) सूक्ष्म पतपुरवठा योजना :– या योजनेअंतर्गत अशासकीय संस्था मार्फत स्वयंसहायता गटातून कर्ज पुरवठा करण्याची संस्थेला 5 लाखापर्यंत कर्ज मंजूर



Scanned with OKEN Scanner

करण्यात येते. गटाच्या सदस्याला जास्तीत जास्त रू. 20,000/– या मर्यादेपर्यंत मंजूर करण्यात येते. 9 टक्के व्याजाने परतफेड 2 वर्षात करावयाची असते.

(5) स्वयंसक्षम कर्ज योजना :– या योजनेअंतर्गत व्यावसायीक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना कर्ज देण्यात यते. या योजनेची प्रकल्प मर्यादा रू. 5 लाख असून राष्ट्रीय विकास महामंडळाचा 90 टक्के वाटा असतो. या योजनेअंतर्गत महिलांना स्वयंरोजगार करता येतो.

(6) महिला समृध्दी योजना :– या योजने अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील महिलांना सरळ अथवा स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून रू. 5 लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. एका बचतगटामधील जास्तीत जास्त 20 महिलांना प्रत्येकी रू. 25,000/– इतके कर्ज 4 टक्के व्याजदराने देण्यात येते. परतफेडीचा कालावधी 5 वर्षाचा असतो. याबरोबर प्रशिक्षण योजना, पणन संयोजन इत्यादी योजना कार्यान्वित केल्या जातात.

**केंद्र सरकारच्या विविध योजना :–**

राज्य सरकार प्रमाणेच केंद्र सरकार स्त्रियांना आत्मनिर्भर करण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करीत असते आणि या मार्फत महिलांचा विकास करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. गृहअर्थशास्त्रांतर्गत येणाऱ्या विविध गुणांचा विकास करण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून महिलांचा विकास करणे, त्यांना अर्थसहाय्य करणे हे धोरण राबविण्यात येते.

(1) महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांना कमी दरात कर्ज पुरवठा देणे :–

या योजनेचा शुभारंभ राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते 10 ऑक्टोबर 2008 रोजी संपन्न झाला. हे कर्ज रू. 25,000/– ते 2,00,000/– पर्यंत असते, कर्जफेडीची मुदत 3 वर्षापर्यंत असते. कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध झाल्यास स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या निर्भर होण्यास निश्चितपणे मदत होईल व विविध स्वंयरोजगाराच्या संधी प्राप्त होतील.

(2) ग्रामीण रोजगार हमी योजना :–

ग्रामीण महिलांना रोजगार उपलब्ध करून देऊन अर्थसहाय करणे, प्रत्येकीला मजूरी देणे, कामाच्या ठिकाणी लहान मुलांसाठी दाई, पाळणाघर, आरोग्य सुविधा



Scanned with OKEN Scanner

इत्यादी व्यवस्था करणे, अशा विविध माध्यमातून घरातील प्रत्येक स्त्रीला रोजगाराच्या संधी प्राप्त होऊ शकतात.

(3) पंतप्रधान योजना :–

आपल्या राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी या योजनेची कार्यवाही केली जाते आणि योग्य अशा प्रशिक्षणाने सुप्त गुणांची जाणीव करून देता येते व उद्योजकांचा प्रभाव वाढविता येतो. या योजनेअंतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रम कार्यान्वित केले जातात. महिलांसाठी गृहअर्थशास्त्रांतर्गत बँकाच्या कर्ज योजने खालील स्वयंरोजगाराच्या संधी महिलांचे स्वागत करीत आहेत. या योजनेतून महिलांना अर्थसहाय्य मिळून त्या स्वावलंबी बनु शकतात.

(4) माहिती केंद्र :–

आजच्या काळात घरबसल्या विविध माहिती देणारे केंद्रे चालविण्याची मोठी संधी महिला बचत गटतांना किंवा स्वतंत्र महिलेला उपलब्ध झालेली आहे. शेतकऱ्यांसाठी या योजना, अनुदाने, कर्ज योजना, बाजारभाव इत्यादी सर्व प्रकारची माहिती देणारी केंद्रे बचतगटाच्या माध्यमातुन चालविता येतील. या माध्यमातून माती परीक्षण, घरे रंगविणे, महिलांसाठी ट्रेनिंग सेंटर चालविणे, शिवणकामाची कंत्राटे घेणे, हस्तकालांच्या वस्तू तयार करणे, नर्सरी चालविणे, शेतीची अवजारे व भांडी भाड्याने देणे, रेशीम उत्पादन, सेंद्रीय खते तयार करणे, गांडूळ पाळणातून खत निर्मिती, विम्यांची कामे करणे, पत्रावळी तयार करणे, बायोडिझल तयार करणे, कौटूंबिक सल्ला केंद्र, सुचक मंडळ चालविणे, बायोगॅस प्रकल्प, फुलांचे गुच्छ तयार करणे, वाती व पूजेचे सामान तयार करणे इत्यादी.

(5) शासकीय महिला वसतीगृहे :–

या योजनेत 16 ते 60 वर्षे वयापर्यंतच्या निराधार, निराश्रीत व परित्यक्ता, कुमारी माता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना आश्रय संरक्षण, मुलभूत सुविधा पुरविणे, त्यांचे विवाह आणि नोकरी व्यवसाय या मार्गाने पुनवर्सन केले जाते. शासनामार्फत 16 जिल्ह्यात 20 महिला वसतीगृहे कार्यरत आहेत. गरजू महिलेने स्वेच्छेने वसतीगृहात प्रवेश घेतल्यास 250/– रू. व तिच्यावर अवलंबून असलेल्या पहिल्या बालकास 150/– रू. व दुसऱ्या बालकास 100/– रू. अनुदान देण्यात येते.



Scanned with OKEN Scanner

(6) महिला संरक्षण गृहे :—

वेश्या व्यवसायातून पोलीसांनी सुटका केलेल्या महिलांना व स्वच्छेने दाखल होणाऱ्या महिलांना संरक्षण देऊन पुनवर्सन करण्याकरिता शासनातर्फे संरक्षणगृहे चालविण्यात येतात. यात महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सोयी पुरवून त्यांना व्यवसाय, रोजगार, नोकरी, विवाह या सारख्या मार्गाचा अवलंब करून त्यांचे पुनवर्सन करण्यात येते.

(7) व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन :—

आर्थिकदृष्ट्या मागास कुटूंबातील दहावी पास झालेल्या मुलींना शासनमान्य केंद्रातून पॅकींग, टेलिफोन ऑपरेटर, टंकलेखन, संगणक, नर्सीग आय.टी.आय मधील प्रशिक्षण घेवून शैक्षणिक दृष्ट्या स्वतःचे पुरवर्सन करण्यासाठी दहमहा 100/— रू. विद्यावेतन देण्यात येते.

(8) स्वयंरोजगारासाठी महिलांना व्यक्तीगत अनुदान :—

निराधार, परित्यकत्या, विधवा नैतीक दृष्ट्या संकटात सापडलेल्या आर्थिक दृष्ट्या मागास महिलेस स्वतःच्या कुटूंबास आर्थिक, हातभार लावण्यासाठी खाद्य पदार्थ बनवून विकणे, फळे भाजीपाला विक्री इत्यादी छोटे व्यवसाय करण्यासाठी 500/— रू. अनुदान एकदाच देण्यात येते.

(9) महिला मंडळांना सहायक अनुदान :—

आर्थिक दृष्ट्या मागास कुटूंबातील महिलेस टंकलेखन, भरतकाम, खाद्य पदार्थ बनविणे, टि.व्ही दुरूस्ती, संगणक प्रशिक्षण, शिवणकाम इत्यादी प्रशिक्षण नोंदणी करून महिलामंडळा मार्फत व महिला प्रशिक्षण केंद्राद्वारे दिल्या जाते. यासाठी महिला मंडळाला वार्षिक 43,000/— रू. अनुदान देण्यात येते व महिलेस प्रशिक्षण काळात दरमहा 75/— रू. विद्यावेतन देण्यात येते.

(10) आधारगृहे सुधारित माहेर योजना :—

16 ते 60 वर्षे वयापर्यंतच्या निराधार, निराश्रीत, कुमारी माता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या परितक्त्या महिलांना आश्रय संरक्षण व मुलभूत सुविधा पुरवून त्यांचे पुनवर्सन करण्याची स्वयंसेवी संस्था मार्फत आधारगृहे चालविली जातात. या योजने अंतर्गत महिलेस दरमहा 250/— रू. अनुदान देण्यात येते. शासनाकडून स्वयंसेवी संस्थेस प्रत्येक महिलेच्या पालन पोषणासाठी दरमहा



Scanned with OKEN Scanner

750/— रू. अनुदान देण्यात येते. राज्यात सहा जिल्ह्यात 9 संस्था कार्यरत आहेत.

(11) अनाथ मुलींच्या विवाहसाठी अर्थसहाय्य :—

शासकीय व स्वयंसेवी संस्थांची आधारगृहे, महिला वसतीगृहे व सुधारीत माहेर योजने अंतर्गत असलेल्या संस्था संरक्षण, गुन्हे, अल्पमुदती निवासगृहे, शासनमान्य अनुदानित बालगृहे या सर्व संस्थामधील अनाथ मुलींच्या विवाहासाठी 15,000/— रू. अनुदान शासनामार्फत दिले जातात. त्यापैकी 10,000/— रू. राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्यात येतात व 5,000/— रू. 5,000/—/— रूपयांचे संसारोपयोगी साहित्य देण्यात येते.

(12) निराश्रित विधवांच्या मुलींसाठी विवाह अनुदान :—

शासनामार्फत 2000/— रू. अनुदान देण्यात येते. यासाठी विवाहसमयी मुलीचे वय 18 वर्षे व मुलाचे वय 21 वर्षे पूर्ण झालेले असावे.

(13) बहुउद्देशीय महिला केंद्रे :—

महिलांच्या खुल्या वातावरणात विचारांचे आदानप्रदान करणे, वाचनालये, महिलांना केंद्रशासन व राज्य शासनाच्या विविध योजना व उपक्रम, कायदेविषयक मार्गदर्शक माहिती देणे, शिक्षण व्यावसायिक प्रशिक्षण निवडण्यासाठी मार्गदर्शन करणे, आपदाग्रस्त महिलांना आधार देणे, अशा सेवा या केंद्रातून दिल्या जातात. याकरीता 41,100/— रू. अनुदान देण्यात येते.

(14) हुंडा दक्षता समिती :—

हुंडा पध्दतीस आळा घालण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सदर समिती कार्यरत असून चर्चासत्रे, शिबीरे यातून प्रचार केला जातो. यासाठी दरवर्षी 8,300/— रू. अनुदान दिले जाते.

(15) कामधेनू योजना :—

गरजू महिलांना घरच्या घरी काम मिळून त्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांना लागणाऱ्या वस्तु निर्मितीचे 50 टक्के काम नोंदणीकृत महिला संस्थांना देण्यात येते.



Scanned with OKEN Scanner

(16) महिलांकरीता समुपदेशन केंद्र :–

समाजिक व नैतिक संबंधात सापडलेल्या महिलांना आश्रय देवून सल्ला व मार्गदर्शन करणे, तसेच हेल्पलाईन सुविधा पुरविण्याचे काम या केंद्रामार्फत केल्या जाते. या केंद्राला दरवर्षी 2,30,660/– रूपयांचे अनुदान देण्यात येते. 2006–07 या वर्षात नवीन 10 महिला समुपदेशन केंद्रे स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. ही केंद्रे राज्यात टाटा सामाजिक विज्ञान केंद्र, मुंबई मार्फत कार्यरत आहेत.

(17) महिला आर्थिक विकास महामंडळे :–

दिनांक 24 फेब्रुवारी 1975 रोजी या महामंडळाची स्थापना झाली. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकासात्मक योजनांकरिता शिखर संस्था म्हणून हे महामंडळ कार्य करते. महिलांच्या क्षमतावृध्दी प्रशिक्षण, कौशल्यबुध्दी शिक्षण व्यवसाय, शेतीवरील आधारित प्रशिक्षण, स्वयंसहायता बचत गट, महिला उद्योजकता असे कार्य हा महिला आर्थिक विकासमंडळाला मार्फत केल्या जाते. स्वयंसहायता बचतगटातर्फे रमाई महिला सक्षमीकरण योजना, आदिवासी विकास योजना, स्वयंसिध्द, तेजस्वीनी आदी योजना राबविल्या जातात.

(18) महिला व बालकल्याण समिती :–

सर्व जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी ही समिती स्थापण्यात आली आहे. समितीद्वारे 41 प्रकारच्या महिला व बालकल्याण योजना राबविल्या जातात. 5 ते 10 टक्के निधी जिल्हापरिषद खर्च करते व उर्वरित निधी शासन पुरविते. वैयक्तिक लाभाच्या 24 योजना राबविल्या जातात.

(19) जिजामाता महिला आधार विमा योजना :–

1 मे 1999 या महाराष्ट्र दिनापासून जिजामाता महिला आधार विमा योजना राज्यात राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत 21 ते 70 वयोगटातील कुटूंबप्रमुखाच्या अपघाती निधन झाल्यास 25 हजार एकर कमी अर्थसहाय्य नॅशनल विमा कंपनीकडून पत्नीला किंवा मुलीना देण्यात येते.



Scanned with OKEN Scanner

(20) बालिका समृध्दी योजना :—

15 ऑगस्ट 1997 नंतर जन्मलेल्या मुलींसाठी बालिका समृध्दी ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येते. कुटूंबातील जास्तीत जास्त दोनच मुलींना अर्थसहाय्य दिल्या जाते.

(21) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना :—

या योजनेत शहरी बेरोजगार किंवा अर्ध बेरोजगार गरीब यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साह देऊन लाभदायी रोजगार पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. या योजनेत दोन विशेष योजनांचा अंतर्भात आहे. त्या म्हणजे :—

1) शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम   2) शहरी मजुरी रोजगार कार्यक्रम

महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी मातृत्व अनुदान योजना, सावित्रीबाई फुले कल्याण योजना, खाजगी स्त्री रोग तज्ञांच्या सेवा इत्यादी योजना राबविल्या जात आहेत.

**निष्कर्ष :**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध शासकीय योजनांद्वारे स्वयंरोजगारासाठी सहज अर्थसहाय्य मिळवून देता येते. घरच्या घरी विविध उद्योग करून महिला केवळ संघटीत होत नाही तर त्या स्वतःच्या कष्टातून काही बचत करतात व काटकसरीने स्वतःच्या आर्थिक उन्नतीकडे वाटचाल करतात. त्यामुळे महिलांना एक यशाचे, स्वावलंबनाचे यशस्वी दालन मिळू शकते. सरकारी योजनांद्वारे महिलांचा विकास तर घडून येतो शिवाय राष्ट्राची प्रगतीसुध्दा घडून येते. आजच्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या युगात व्यापर, उद्योग व स्वयंरोजगारामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला योग्य हातभार लागत आहे. विशेष म्हणजे यासाठी केंद्र व राज्य व सहकारी बँका वित्तपुरवठा करून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया जलद गतीने पार पाडत असते.



Scanned with OKEN Scanner

**सूचना व उपाययोजना :–**

1) विविध शासकीय योजनांची माहिती ग्रामीण व शहरी महिलापर्यंत पोहजविण्याचा प्रयत्न व्हावा, जेणेकरून त्यांना त्याचा लाभ घेता येईल.
2) अर्थसहाय्याची विविध माध्यमे व पध्दती यांचे प्रशिक्षण ग्राम प्रशासन स्तरावर दिले गेले पाहिजे व सवलतीचे असले पाहिजे.
3) स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.
4) अर्थाजनाच्या योग्य संधी उपलब्ध करून स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण करणे उपयुक्त आहे.
5) आर्थिक सक्षमीकरणात स्त्रियांचा फक्त अर्थाजनाचा विचार न करता उत्पादनाच्या साधनांवर मालकी तीला मिळवून देणे जेणेकरून ती स्वावलंबी होईल.
6) महिलांना स्वयंरोजगाराच्या प्रशिक्षणाबरोबरच कायदा, व्यापर व व्यवहारांचे ज्ञान देण्यात यावे. त्यामुळे सामाजिक व कौटूंबिक कलह टाळता येईल.

**संदर्भ :–**

1) प्रतिबिंब– महिला समस्यांचा आत्मशोध
संपादक – डॉ निळकंठ भुसारी, डॉ पोच्छी / डॉ निकम
2) भारतातील महिला विकासाची वाटचाल
ज.शुं. आपटे, पुष्पा रोड
3) 'योजना' मासिक भारत सरकार प्रकाशन
4) Govt. of India Economics Surveys



Scanned with OKEN Scanner

# ABSTRACT

## National Steps for Women Empowerment
## राष्ट्राने महिला सबलीकरणासाठी उचललेले पाऊल

**डॉ. कविता आर. बोरकर**
सहयोगी प्राध्यापक
गृहअर्थशास्त्र विभाग
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज,
भामटी, रिंग रोड, नागपूर 22.
मो. : 9730538882
Email :- kavitaborkar52@gmail.com

'महिला सबलीकरण' ही संकल्पना महिलांच्या विकासाच्या संदर्भात रूढ झाली आहे. पावलो फ्रोरे यांनी सर्वप्रथम ही संकल्पना उपयोगात आणली. अबला महिलांना सबला करणे, त्यांना हक्क व संधी देणे. हा उद्देश त्यांना अभिप्रेत होता.

स्त्री म्हणजे निसर्गरूपी चित्रकाराच्या कुंचल्यातून साकारलेली एक अप्रतिम कलाकृती आणि या कलाकृतीला पूर्णत्व बहाल करण्यासाठी या चित्रकाराने तिच्यात वैविध्यपूर्ण छटा किंवा रूपे साकारली, ज्याची प्रचिती आपल्याला तिच्या प्रत्येक भूमिकेतून येते. नवसृष्टी निर्माण करण्याची क्षमता असणारी हळवी स्त्री असो, तर कधी कुटूंबाला सर्वस्व अर्पण करणारी त्यागी स्त्री असो आणि प्रसंगी रणरागिणी दुर्गा बनून नरसंहार करणारी स्त्री असो. सर्व भूमिकांना योग्य न्याय देण्याची कला तिच्यात उपजतच आहे.

भारतातील स्त्रीमुक्तीच्या कामगिरीत डॉ. आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आणि क्रांतीकारक आहे. वंचित, शोषित, पीडित महिला वर्गाच्या सबलीकरणासाठी, सक्षमीकरणासाठी त्यांची कामगिरी ही आधारभूत आणि साहाय्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

**सूचना व उपाययोजना :–**

1) विविध शासकीय योजनांची माहिती ग्रामीण व शहरी महिलापर्यंत पोहजविण्याचा प्रयत्न व्हावा, जेणेकरून त्यांना त्याचा लाभ घेता येईल.

2) अर्थसहाय्याची विविध माध्यमे व पध्दती यांचे प्रशिक्षण ग्राम प्रशासन स्तरावर दिले गेले पाहिजे व सवलतीचे असले पाहिजे.

3) स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.

4) अर्थाजनाच्या योग्य संधी उपलब्ध करून स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण करणे उपयुक्त आहे.

5) आर्थिक सक्षमीकरणात स्त्रियांचा फक्त अर्थाजनाचा विचार न करता उत्पादनाच्या साधनांवर मालकी तीला मिळवून देणे जेणेकरून ती स्वावलंबी होईल.

6) महिलांना स्वयंरोजगाराच्या प्रशिक्षणाबरोबरच कायदा, व्यापर व व्यवहारांचे ज्ञान देण्यात यावे. त्यामुळे सामाजिक व कौटूंबिक कलह टाळता येईल.

**किवर्ड :** महिला, सबलीकरण, योजना, राष्ट्रीय, आर्थिक

Scanned with OKEN Scanner